# माझ्याचसारखा . . .

सकाळी लेडी जमशेदजी रोडवरून फिरत असताना तो दिसला.
माझ्यासारखा दुसरा एक जण. अगदी माझ्यासारखा.
गोठल्यासारखा मी एका जागी स्तब्ध उभा राहिलो. थेट माझ्यासारखाच एक माणूस पलिकडच्या फूटपाथवर उभा होता. माझ्याच उंचीचा माझ्याच बांध्याचा. माझ्यासारखाच चेहरा मोहरा, माझ्याच वर्णाचा. माझ्यापासून काही अंतरावर उभं असलेलं माझंच  शरीर म्हणाना. पाहताच क्षणी मी थोडा घाबरलो. तसं पाहिलं तर घाबरण्यासारखं काय होतं त्यात ? हा तर किती मजेशीर प्रसंग. आपणच आपल्याला इतक्या सहजपणे कधी पाहू शकतो नाहीतर ? आरशात दिसते ती देखील आपली उलटी आणि भ्रामक प्रतिमा. संत-महात्मे महाप्रयत्नानं स्वत:मधून बाहेर पडून स्वत:कडे पाहायचे. इथं कोणत्याही प्रकारची योगसाधना न करता आपल्याला हे साध्य झालंय. त्याबद्दल भीती कसली वाटून घ्यायची ? अगदी त्यावेळी देखील हे सर्व सुचत होतं; पण तरीही भीतीचा किडा आत वळवळत राहिला. त्याचा पुढं साप बनला. नंतर वाढत जाऊन त्याचा अजगर बनला आणि माझ्या अंगाभोवती लपेटून राहिला. इतक्यात समोरचा माणूस गर्दीत कुठेतरी अचानक नाहीसा झाला.

भीतीचे विळखे कालांतरानं सैल होतील असं वाटलं. पण नाही.  तो दिवस दु:स्वप्नासारखा बरेच दिवस मनाला चिकटून राहिला. नंतर मात्र परिणाम कमी कमी होत गेला; भीती नाहीशी होऊन गेली. एकदा सकाळी चहा पिताना ते दृश्य आठवून गंमत वाटली.  हळूहळू त्याच्याविषयी कुतूहल वाटायला लागलं. कोण असेल तो ? काय नाव असेल त्याचं ? त्याची आपली जन्म तारीख पण एक असेल का ? त्यादिवशी त्याला आपण दिसलो का ? दिसलो तर काय प्रतिक्रिया होईल त्याची ?

या गोष्टीला आठवडा उलटून गेला असेल. परवा तो पुन्हा दिसला.
याखेपेस आधीच्यापेक्षा थोडा अधिक रूबाबदार. सरळ जाऊन त्याला त्याचं नाव विचारून टाकावं का ? पण घाई करून उपयोगी नाही. सरळ त्याच्या पुढयात जाऊन उभं राहण्यात अर्थ नव्हता. घाबरून पळून जायचा. तो माझ्यापेक्षाही भित्रा असण्याची शक्यता होती. मीन राशीचा असेल रे असणारच असणार . त्याच्या राशीबद्दल सोडा, स्वभावाबद्दल मला कुठे काय माहीत होतं. तो फक्त दिसायला माझ्यासारखा होता. दिसायला सारखी असलेली माणसं स्वभावानं सारखी असतात असं कुठं आहे. सुमीच्या आत्याची जुळी मुलं नाही का एकमेकांपेक्षा स्वभावानं कितीतरी वेगळी. एक कमालीचा हट्टी. दुसरा शांत, संतवृत्तीचा.

सिनेमा पाहताना तो त्रास देईल असं वाटलं नव्हतं. पडद्यावरल्या चित्राकडे लक्ष लागत नव्हतं. डोळ्यासमोर त्याच्या संदर्भातलेच प्रश्न नाचत होते. सारखं तेच. दिसायला सारख्या असणाऱ्या माणसांचे स्वभाव सारखे असतात का ? त्यांच्या आवडीनिवडी सारख्या असतात का ? आत्याच्या जुळ्या मुलींचं उदाहरण एक्सेप्शन कशावरून नसेल. डायजेस्टमध्ये कधी काळी वाचलेल्या मजकुराची पानं समोर आणायचा प्रयत्न केला. इंटरेस्टिंग स्टोरीज होत्या; पण ठाम शास्त्रीय निष्कर्ष नव्हते. ठाम निष्कर्ष वगैरेचं एकूण वावडंच असतं डायजेस्टमधल्या लेखांना. आणि त्यातल्या किती खऱ्या आणि किती खोट्या असतात कोण जाणे.

दोन दिवसांनी सकाळी त्याच इमारतीशी तो पुन्हा दिसला.
त्याला नीट जवळून पाहणं महत्त्वाचं होतं. कदाचित त्याची डावी बाजू माझ्यापेक्षा वेगळी असेल. काय काय चमत्कारिक विचार येतात मनात. जवळून पाहायचं असेल त्याच्या लक्षात येणार नाही; तो पळून जाणार नाही याची दक्षता घेऊन ते काम करावं लागणार. पक्षीशास्त्रज्ञ पक्ष्यांचं जवळून निरीक्षण करण्यासाठी जे तंत्र वापरतात ते आपल्याला वापरावं लागणार या केसमध्ये. विचारात मग्न असता तो पुढयातून कधी हलला समजलंच नाही.

नंतर चार दिवसांनी फोर्टात दिसला. इथं ऑफिस आहे की काय त्याचं ?
आकाश ढगाळलेलं होतं. दुपारपासून काळसर नरम प्रकाश सगळीकडे पसरला होता. कोणत्याही क्षणी पाऊस कोसळेल असं वाटत होतं. असा पाऊस पडला की मी रेनकोटनं शरीर झाकून त्याच्या जवळ जाऊ शकतो. सिगारेट पेटवायचं निमित्त करून त्याच्याकडे माचिसही मागू शकतो. काळा उजेड नुसता तासभर सर्वत्र पसरून राहिला होता पाऊस काही कोसळत नव्हता. दरम्यान पक्षी उडून जावा तसा तो तिथून गेला.

नंतर अनेक दिवस नुसती खंत वाटत राहिली. आपल्या हातून घडत काही नाही. नुसतेच विचार. सगळा वेळ उलटसुलट विचार करण्यात जातो. दुर्बिणीसारखी साधी चीज आपल्याकडे का असू नये ? पारकरकडून उसनी घेतलेली दुर्बिण तत्परतेनं परत करायची आपल्याला काय गरज होती. शिवाय तो म्हणत होता राहू दे. माझ्याकडे राहिली काय किंवा तुझ्याकडे राहिली काय, सारखंच. पण आपल्याला आपला प्रोफेशनॅलिझम मिरवायचा होता. पारकरला मोबाईल लावला. तर तो म्हणाला, थोडया वेळानं करतोस का प्लीज.. आता मी मिटिंगमध्ये आहे. इथं बंगलोरला सगळ्या हेडस्ची मिटिंग भरली आहे.

तब्बल दहा दिवसांच्या अंतरानं तो दिसला. मागच्यासारखाच पलीकडच्या फूटपाथवर. भीतीचाही सराव होतो. रूटीन होऊन जाते भीती. माझी भीड एव्हाना चेपली होती. टॅक्सी करावी सरळ आणि यु टर्न घेऊन सरळ त्याच्या पुढयात उभं राहावं असा बोल्ड विचार मनात आला.   टॅक्सीच्या मागच्या सीटवरून त्याला नीट पाहाता येईल असं वाटलं. गिऱ्हाईक रस्ता ओलांडायला टॅक्सी वापरते आणि नंतर उतरायचं सोडून टॅक्सीतच बसून राहाते या प्रकारानं टॅक्सीवाला वैतागण्याची शक्यता होती. पण त्याचा वैताग दूर करण्यासाठी माझ्याकडे पन्नासची नोट होती.
रस्ता जिथं संपत होता त्या बिंदुतून नव्या गाडया उगवत होत्या. त्या गाडयात रिकामी टॅक्सी दिसेना. एकवार घड्याळाकडे पाहिलं. नंतर समोरच्या फुटपाथवर पुन्हा एकदा नजर टाकली. तो तिथून गायब झाला होता. धावत रस्ता क्रॉस करून समोर गेलो कॉर्नरपाशी जाऊन इथं तिथं पाहिलं. तो कुठेच नव्हता. वेडयासारखी अवस्था झाली. 'महल' सिनेमातली नर्तिका बघता बघता डोळ्यासमोरून नाहीशी होते तो सीन आठवला. त्याच्या माझ्यातला एक फरक आता निश्चित झाला. तो माझ्यापेक्षा जास्त चपळ निघाला.

नंतर जवळजवळ पंधरावीस दिवस त्याचा पत्ता नाही. भुतासारखा दिसला तो; आणि आता भुतासारखा अदृश्य झाला. इतकं अफाट वस्तीचं शहर शेकडो रस्ते,  हजारो गल्ल्या आणि अरूंद बोळ. त्याच्या शोधासाठी मुद्दामहून गजबजलेलं शहर पालथं घालायचं. कशासाठी ? काय एवढी काय गरज आहे ?

तो दिसेनासा झाल्यावर त्याच्या संबंधीचे विचार वाटणारी हलकीशी भीती आणि कुतूहल सगळं संपून जाईल असं वाटलं. पण अंदाज सपशेल चुकला. स्वतःचंच भूत स्वतःच्या मानेवर बसावं असं झालं. आता तर प्रत्यक्षात तो समोर नसता तो सारखा समोर दिसू लागला. सकाळी उठल्यापासून सतत अस्वस्थ. तोंडावर पाण्याचे हबके मारले. तेवढयापुरतं बरं वाटलं. तोंडासमोर वर्तमानपत्र धरून वाचायचा प्रयत्न केला. एकही बातमी डोक्यात शिरेना. अक्षरं वाचता येत होती. पण शब्दाचे अर्थ कळेनात. पेपरच्या पानावर अधूनमधून त्याचा चेहरा सुपरइम्पोझ होत राहिला. वर्तमानपत्राऐवजी आपण चुकून समोर आरसा धरलाय की काय अशी शंका यावी असा हा प्रकार.

पुढले अनेक दिवस उठता बसता त्याचाच विचार. आज मात्र फ्रेश वाटू  लागलं. नित्याचे व्यवहार आणि कामं मी विनाव्यत्यय करू लागलो. अधनंमधनं त्याचा चेहरा डोळ्यासमोर तरळायचा. नाही असं नाही. पण तो पाहून अस्वस्थ वगैरे अजिबात वाटायचं नाही. महिन्यापूर्वीची ही गोष्ट. आता हळूहळू आपण सारं विसरून जाऊ. आऊट ऑफ साइट इज आऊट ऑफ माइंड. अशा सगळ्या विचारात असता संध्याकाळी फिरायला गेलो असता तो दिसला.
मोटारसायकलला रेलून उभा होता. ते फुर्रफुरणारं वाहन मला कधीच आवडलं नाही. मोटारसायकल हाकणारे तरूण पण मला नेहमीच उद्दाम वाटत आलेत. त्यात धूम नावाचा तो हिंदी सिनेमा पाहिल्यापासून तर मला ते समाजशत्रूच वाटू लागलेत. तो कुणाची तरी वाट पाहात असावा. हातातल्या हेल्मेटवर अंगठी वाजवत तो उभा होता. बहुधा कोणा सेक्सी शीलाची तो वाट पाहात असणार.  माझा अंदाज खरा ठरला. टाईट जीन्स घालून  एक शीला खरोखरच त्याच्या जवळ आली आणि हाय म्हणत त्याला भिडली. टांग टाकून तो बाईकवर बसला. पाठोपाठ ती तरूणीही त्याच्या मागे त्याला बिलगून बसली. एका किकमध्ये बाईक सुरू झाली. तिचा धूर मी उभा होता तिथल्या आर्ट गॅलरीच्या पायऱ्यांपर्यंत येऊन पोचला. एखाद्या मवाल्यानं सिगरेटचा धूर मुद्दाम चेहऱ्यावर सोडावा तसं मला वाटलं. डिसग्स्टिंग. धीस इज शीअर डिसग्स्टिंग. मी ओठातल्या ओठात पुटपुटलो. सिनेमातले स्मगलर घालतात तसे चंगीभंगी कपडे त्यानं घातले होते.
त्यादिवशी प्रथमच त्याच्या कपडयाकडे माझं लक्ष गेलं. त्या मुलीचे कपडे तर आयटेम गर्लकडून भाडयानं आणल्यासारखे वाटत होते. कदाचित ती मुलगीही भाडयानं आणली असेल. त्या पोरीची शॉर्ट हाफ पॅंट सर्व बाजूंनी उंदरानं कुरतडल्यासारखी दिसत होती. ते तिथून नाहीसे झाल्यावर मी तिथं उभं राहण्यात मतलब नव्हता.

रात्री झोपेत त्या सीनचा ॲक्शन रिप्ले चालू होता.
पहाटे मळमळल्यासारखं वाटत होतं.  त्याचं त्या लाऊड पोशाखातलं दर्शन संतापजनक होतं. साल्याला कपडयाचा चॉइस नाही. तसे त्या पोशाखात आजकाल अनेक तरूण हिंडतांना दिसतात. पण असा चीप ड्रेस घालून एक माणूस माझा चेहरा धारण करून फिरतोय हे भयंकर बेकार होतं. मागे चिकटून बसलेली ती मुलगी तरी काय प्रकारची असेल ?

पूर्ण रात्रभर झोप लागली नाही. आपला चेहरा आपलं शरीर धारण करून कुणीतरी आपली विटंबना करत गावभर हिंडतोय आणि आपण काही करू शकत नाही हे काय फीलिंग असेल, प्रसंग ओढवल्याशिवाय कोणाला कळणार नाही.
सरळ त्याला गाठून जाब विचारावा असं सारखं मनात येऊ लागलं. जाब तरी कसला विचारणार ? कोणी कोणते कपडे वापरायचे, कसं वागायचं हे आपण कोण ठरवणार ? हा ज्याच्या त्याच्या आवडीनिवडीचा प्रश्न आहे. थेट दुसऱ्या एका व्यक्तिच्या चेहऱ्यासारखा चेहरा असणं हा काही गुन्हा नाही. कोणत्याच देशात, कोणत्याच कायद्याखाली अशा कृत्याबद्दल अटक होऊ शकत नाही.
इराण्याचा चहा पिता पिता अश्विन मला हेच समजावून सांगायचा प्रयत्न करत होता.
हे बघ, हातातला कप खाली ठेवून तो म्हणाला, तुझा खरा आक्षेप आहे तो त्याच्या पोशाखाला, राईट ? सवंग पोशाख घातलेल्या माणसानं आपला चेहरा घेऊन लोकात वावरू नये असा काहीतरी तुझा वेडगळ आग्रह आहे. अर्थात असा आग्रह तू बाळगू शकतोस. कोणी कशाचे आग्रह बाळगावेत हे आपण कोण ठरवणार ? तर त्याबद्दल कोणाचे काही आक्षेप नाहीत. फक्त तुझी तक्रार कोर्टात स्टॅण्ड होऊ शकत नाही. एखादा माणूस मवाल्यासारखा दिसतो म्हणून काही त्याला अटक करता येत नाही. कायदा असलं काही जाणत नाही. देशात आणीबाणी जाहीर झाली तरच प्रतिबंधात्मक उपाय म्हणून गुंडांची धरपकड केली जाते.
"हे सगळं मला माहीत आहे रे. हे ऐकवण्यासाठी नाही बोलावलंय तुला मी. यातून काही तरी वे-आऊट सांग."
"वे- आउट कसला. वे- आऊट काहीच नाही लेका, कारण तू मुळात यात अडकलेलाच नाहीस. कशातून बाहेर येणार तू?"
"असं कसं बोलतोस ?"
"अरे, तू स्वतःच स्वतःला त्यात अडकवून घेतलेस विनाकारण. दोन किंग फीशर मागव. यातून बाहेर यायचा हाच एक मार्ग आहे."
मी मागवलेली बिअर अश्विन पीत राहिला. त्यानं बोलण्याचा विषय बदलला. तो एकदम देहली-बेल्लीतल्या फोर लेटर वर्डस बद्दल बोलायला लागला. माझ्या प्रकरणातून बाहेर यायचा प्रयत्न करतोय हे मी समजून चुकलो. पण मलाही माझ्या प्रकरणातून बाहेर यायचंय त्याचं काय ?

अश्विनशी झालेल्या बिअर  सेशननंतरच्या दुसऱ्या दिवशी तो मवाली माणूस फोर्ट एरियात दिसला.
कसलंसं नक्षीकाम केलेलं जाकीट, त्यातून बाहेर पडलेले ते उघडे दंड; गळ्यातली सोन्याची चेन दाखवण्यासाठी छातीवरची बटणं खुली केलेली. सगळं ते.  या खेपेला मोटारसायकलच्या मागे बसलेली पोरगी तेवढी वेगळी होती.
मला अजयची आठवण झाली. त्याला कोणी म्हटलं की काल तुला बॅण्ड स्टॅण्डला बघितलं. बरोबरची ती पोरगी कोण होती रे ? अजय म्हणायचा, वार कुठला होता सांग, मी तुला पोरीचं नाव सांगतो. हा माझा तोतया पोरी फिरवण्याव्यतिरिक्त आणखी काय काय करत असेल ? मी माझी मध्यमवर्गी कल्पनाशक्ती लढवायला लागलो.

बाहेर घडलेलं सगळं संध्याकाळी घरी बायकोला रिपोर्ट करायचा माझा स्वभाव नाही. पण  हा प्रकार मी सुमीच्या कानावर घातला. तिला त्याचं विशेष काही वाटलं नाही. निदान तिनं तसं चेहऱ्यावर दाखवलं नाही.
"असतात एकाद वेळी दोन माणसं एकसारखी. त्याचं एवढं काय वाटून घ्यायचं." ती कॅज्युअली पुटपुटली. हे तिनं मला अनेकदा बोलून दाखवलं होतं.
"प्रश्न सारखं दिसण्याचा नाही ग, सुमी." मी तिला समजावून सांगू लागलो. तर ती चादरीची घडी घालत आतल्या खोलीत निघून गेली. थोडया वेळानं ती खोलीतून बाहेर आली आणि म्हणाली, "दुपारच्या डब्यासाठी काय देऊ ते सांगणार होता."

उगाच चेष्टेला विषय नको म्हणून म्हणून त्या माणसाचं प्रकरण मी ऑफिसातल्या कधी कोणाशी बोललो नव्हतो. मात्र आज धीर करून वाडेकरला सगळं सांगून टाकलं. अपेक्षेनुसार सुरावतीला तो जोरात हसला. . मी त्याच्या हशात सामील न होता मख्खपणे

त्याच्याकडे पाहात राहिलो माझ्या दृष्टीनं हे सिरिअस मॅटर आहे हे नंतर त्याच्या लक्षात आलं असणार. स्तःला सावरून, चेहरा गंभीर करून थोडा पॉझ घेऊन तो म्हणाला. “हे बघ अनल, तू सयकॅट्रीस्टची अपॉंइंटमेंट का घेत नाहीस?”
अनिल चक्क मला मानसिक विकार झालेला माणूस ठरवत होता. म्हणजे साध्या सोप्या मराठीत वेडाच.
लंच टाईममध्ये मी टॉपिक पुन्हा ओपन केला. वाडेकर सयकॅट्रिस्टचाा मुद्दा काही सोडायला तयार नव्हता. मी त्याला म्हटलं, मला हे सगळे भास होताहेत  असं तुला म्हणायचंय का? पाहिजे तर माझ्याबरोबर चल एकदा. त्याच्या मोटारसायकलचा नंबर हवा तर मी तुला देतो. तू जाऊन पाहून ये.
नंतर माझ्या लक्षात आलं तो मित्रांच्या मोटारसायकली वापरत असणार. नंबर कोठून आणणार आपण. दुसऱ्या वेळी मोटारसायकलवर त्याला पाहिलं तेव्हा त्याला चिकटून बसणारी ती पोरगी जशी नवी होती तशी मोटारसायकलही नवी होती. त्याची एकूण बॉडी लँग्वेज पाहाता तो स्मगलिंगबिगलिंगच्या रॅकेटमध्ये असणार अशी माझी आता खात्रीच झाली.

ऑफिसला जाण्यासाठी बस-स्टॉपवर उभा असता सिनकरची आठवण झाली. प्रताप सिनकर माझा कॉफी हाऊसमधला दोस्त. कॉलेजात आम्ही मध्यमवर्गी परंपरेनुसार भरपूर मार्क मिळवायसाठी भरपूर अभ्यास करायचो. तर प्रताप अभ्यासाचा नॉशिया असल्याप्रमाणे वागायचा. बराच काळ कँटीनमध्ये बसून असायचा. सिगरेटी फुंकत रग्गड पैसा कसा मिळवता येईल याचे प्लॅन आखायचा. मला तेव्हापासून डाऊट होता हा स्मगलिंगच्या बिझिनेसमध्ये उतरायचा प्रयत्न करत असावा. नंतर नंतर माझा अंदाज कन्फर्म होत गेला. तो स्वतः मात्र आपण गार्मेंट एक्सपोर्टच्या उद्योगात असल्याचं सांगायचा. अशा कामाला प्रतापच उपयोगी पडेल. प्रतापला स्टॉपवरूनच फोन लावला. तर सिनकरसाहेब दुबईला गेल्याचं कळलं. बॅड लक. कधी परत येणार विचारायच्या आधीच रिसेप्शनीस्ट बाईंनी फोन ठेवून दिला.
भविष्यात सयकॅट्रिस्टकडे जायचाच योग दिसतोय.

वाडेकर तर हट्टालाच पेटला होता. कसंही करून मी वेडा असल्याचं सर्टिफिकेट त्याला हवं होतं. एकदा माझ्या हातावर हात ठेवत तो म्हणाला, “हे बघ, तू ऑड वाटून घेऊ नकोस. पण डॉ. मेहता माझे क्लोज फ्रेण्ड आहेत. तू एकदा गेलास की तुझेही ते फ्रेण्ड बनून जातील. मस्त माणूस आहे. मग माझ्याही मनात विचार आला. काय गंमत आहे बघूया तर खरं. अरे, निदान काय गंमत आहे बघून तर ये.”
मी चाट. . . वाडेकरला, च्यायला, माझ्या मनातलं कसं काय ऐकू आलं?
“अॅड्रेस तर देऊन ठेव.” त्याला बरं वाटावं म्हणून मी म्हणालो.
“तू जाणार असलास तर अॅड्रेस देतो. तुला एकट्याला जाणं प्रॉब्लेमॅटिक वाटत असेल तर हवं इतर मी तुझ्या बरोबर येतो.” वाडेकरनं वरच्या खिशात मेहता डॉक्टरांचं कार्ड तयारच ठेवलं होतं.

सिग्नल तोडताना पोलिसानं त्याला पकडलेलं पाहून मला मनातून क्रूर आनंद झाला. नंतर असा आनंद झाल्याबद्दल थोडं अपराधीही वाटलं. तो माझ्यासारखा दिसतो हा काही त्याचा गुन्हा नाही असं पुन्हा पुन्हा मनात यायला लागलं. आपलं त्यानं प्रत्यक्षात काही वाईट केलेलं नाही. तो आता पोलिसाजवळ कशी गयावया करतो त्याची गंमत पाहात तिथंच उभं राहायचं ठरवलं. पण तसं काही घडलं नाही. निर्विकारपणे त्यानं त्या झक्कू जाकीटाच्या हात घातला. शंभराची नोट काढून त्याच हातानं त्यानं पोलिसाशी शेकहॅण्ड केला. मामला खतम. बाईकला कीक मारून तो दुसऱ्याच क्षणी माझ्या डोळ्यासमोरून नाहीसा झाला.

खूप दिवसांच्या गॅपनंतर त्याचं मल्टीप्लेक्स जवळ दर्शन घडलं. थेट जुन्या हिंदी सिनेमातल्या क्रिमिनलसारखा दिसत होता. तो ब्लॅकवाल्याकडून तिकीटं घेणार हे उघडच होतं. आणि तो खरोखरंच ब्लॅकवाल्यांकडे गेला. तो जवळ येताच ओळखीचा माणूस भेटल्याप्रमाणे ते सगळे त्याच्या भोवती गोळा झाले. काहींनी त्याला सलामही केले. एकानं कमरेला खोचून बसवलेला नोटांचा जुडगा काढून त्याच्या हातात ठेवला. नोटा न मोजताच त्यानं शर्टाच्या खिशात सरकवल्या. मी अवाक होऊन बघत राहिलो.

पहाटे अंगात ताप भरला. डॉक्टरकडे जाण्यात मतलब नव्हता. ते व्हायरल फीव्हर सांगून दोन दिवस औषध देऊन झोपवून ठेवणार. रजा घेऊन झोप काढणं मला खरोखरच गरजेचं होतं. पण झोप कुठून यायला. डोक्यात विचारांचा भलता कल्लोळ. उलटसुलट विचारानं मेंदुत ट्रॅफिक जाम.

आतापर्यंत ओके आहे.  उद्या त्यानं मेजर क्राइम वगैरे केला तर? पोलिसाच्या कानावर घालून ठेवावं का? त्यापेक्षा वाडेकर म्हणतो त्याप्रमाणे सयकायट्रीस्टलाच भेटावं. तो ना घरचा दारचा. त्याच्यापुढं सगळं क्लिअरली सांगता येईल.

मेहतांचं क्लिनिक सिनेमात सयकॅट्रिस्टची ऑफिसं दाखवतात तसंच थेट होतं. बाहेर रिसेप्शनीस्ट कम्प्युटरसमोर बसली होती. नाव सांगताच तिनं आत मेहतांच्या केबिनमध्ये जायला सांगितलं. ही इज वेटिंग फॉर यू ओन्ली म्हणताना ती हसली का कळेना. आपल्या प्रकरणाबाबत तिला आधीच काही कळलंय की काय?

मेहता प्रतिक्षा करत होते पण पेशंटची नाही; त्यांच्या बायकोच्या फोनची.  मी आत शिरायला आणि त्यांचा फोन वाजायला एकच गाठ पडली. फोन कानाला लावत त्यांनी हातानंच बसायची खूण केली. लकीली, फोन फार वेळ चालला नाही.

“सॉरी घरचा फोन होता. रात्रीच्या कार्यक्रमाचं ठरवायचं होतं.” डॉक्टर म्हणाले.

मला वि. आ. बुवांसारखं तुम्ही कसले सॉरी मीच सॉरी असं बोलावंसं वाटलं. पण मी काही बोलायच्या आत त्यांनी सुरू केलं.

“केस बरीचशी वाडेकरानं माझ्या कानावर घातली आहे.”

“तुमच्याकडे आम्ही सिनेमात पाहतो तसा कोच नाही डॉक्टर, पेशंटला आडवं व्हायला सांगून शेजारी बसून  प्रश्न विचारायला.”

“नाही कसा? आतल्या रुममध्ये आहे ना. पण तुमच्या केसमध्ये त्याची गरज नाही. अगदी कॉमन केस आहे तुमची. चार सेशनमध्ये आपण आटोपून घेऊ.”

“केस कॉम्लिकेटेड असेल तर किती वेळ लागतो?”

“सहा महिने ते दीड वर्षे. पण ते जाऊ द्या, लेटस् कम टू द पॉइंट. किती पिरिअड झाला तुम्हाला असं फीलिंग यायला?”

“फिलिंग? म्हणजे हा सगळा माझ्या फिलींग्जचा खेळ आहे, हे भास होताहेत मला असं वाटतंय तुम्हाला?”

“नसतील मिस्टर अनल. पण हे अजून ठरायचंय. ७० टक्के केसमध्ये नंतर हे भास असल्याचं सिध्द झालंय.  पण तुमची केस वेगळी असू शकेल. तुमचं हे इमॅजिनेशन आहे की रिअलिटी हे आताच ठरवणं कठीण आहे. सॉरी.”

“डॉक्टर, मी त्याला पहिल्यांदा पाहिलं ना, तेव्हा मलाही क्षणभर आपल्याला भास होतोय असं वाटलं.”

”पहिल्यांदा म्हणजे नेमकं केव्हा? आठवत असेल तर सांगा. नाहीतर राहू द्या.”

“हो सगळं आठवते.” मग मी शक्य तितक्या शांतपणे पहिल्या दिवसापासून सगळं डॉक्टरांना सांगत गेलो.

“इंटरेस्टिंग.” डॉक्टर म्हणाले, “तुम्हाला तुमच्यासारखाच एक माणूस दिसतोय रस्त्यात आणि तुम्ही त्याला अजून भेटला नाहीत.”

“सुरवातीला केला प्रयत्न. पण प्रत्येक वेळी काही तरी गडबड व्हायची.”

“तुम्हाला जुळा भाऊबिऊ तर नाहीना. हिंदी सिनेमात लहानपणी ताटातूट झालेले जुळे भाऊ असतात तसे जुळे भाऊ नव्हते ना तुमच्या घरात?”

मी काही न बोलता डॉक्टरांकडे नुसता पाहात राहिलो.

“आय ॲम जस्ट जोकींग अनल. टेक इट लाईटली.”

“डॉक्टर, इथं सगळ्या आयुष्याचा जोक होऊन बसलाय.”

“हे मात्र मला तुमचं कळत नाही. एक तुमच्यासारखा दिसणारा माणूस तुम्हाला दिसला तर त्यानं तुम्हाला इतकं अस्वस्थ कशाला व्हायला पाहिजे? बरं त्यावर आपण नंतर नीटपणे बोलू.”

बोलता बोलता मेहता खुर्चीतून उठले. उजव्या बाजूच्या ड्रॉवरमधून त्यांनी आठ दहा कार्ड काढली प्रत्येक कागदावर भौमितिक आकृत्या होत्या. कार्ड माझ्यासमोर ठेवून यात तुम्हाला नेमकं काय दिसते त्यांनी मला विचारलं. मला दिसलेल्या माणसाचा आणि याचा संबंध काय मला समजेना. पण मी आकृत्या नीट निरखून उत्तरं दिली. नंतर ते त्यांना काय वाटतं ते सांगू लागले. त्यांच्या काही निष्कर्षांवर मी आक्षेप घेतला. ते त्यांची बाजू मांडू लागले.

सगळ्या वादावादीत मी तिथं कशाला आलोय हेच मला विसरायला झालं.

“तुमची गणितं मी सोडवली आता माझं गणित तुम्ही कधी सोडवताय, डॉक्टर?”

“तुमचं गणित तुम्हालाच सोडवायचं आहे. मी फक्त ते सोडवायला तुम्हाला मदत करणार आहे. आता आपण जे करत होतो तो तुमचं गणित सोडवायचाच एक भाग होता.”

“तुम्हाला अजून मला भास होताहेत असं खरंच वाटतंय का ?”
“नाही, असं नाही वाटत. अजिबात नाही वाटत. ती एक पॉसिबिलीटी मात्र आहे. सगळ्या पॉसिबिलिटी आम्हाला लक्षात घ्यायला लागतात.”
“मला वाटते, डॉ तुम्ही माझ्याबरोबर एकदा या. मी प्रत्यक्ष दाखवेन तुम्हाला तो.  म्हणजे मग तुम्ही पॉसिबिलिटी वगैरे काही म्हणणार नाहीत.”
“शुअर. नक्की येईन. मला कुठे नि केव्हा यायचं ते सांगा.”
डॉक्टरांचा उत्साह बघून मला छान वाटलं. “थॅंक्स, फोन करीन तुम्हाला मी दोन दिवस ॲडव्हान्स. आता मी निघू की तुम्ही आणखी काही गणितं घालणार आहात.”
“हा, हा,” डॉक्टर मोकळेपणानं हसले. “आता गणितं नाही. गणितं दिली की तुम्ही मास्तरांच्याच चुका काढायला लागता. तेव्हा नो मोअर पझल्स.”
वाडेकर म्हणाला ते खरं होतं. डॉक्टर चांगले जॉली निघाले. मुख्य म्हणजे माझ्याबरोबर फोर्टमध्ये यायचं त्यांना लगेच मान्य केलं.

मी दिलेल्या टायमावर डॉक्टर ससून लायब्ररीजवळ हजर झाले. आठवडाभर आधी मी एखाद्या डिटेक्टिव्ह प्रमाणे पाळत ठेवून त्याच्या तिथं येण्याची वेळ पाहून ठेवली होती. डॉक्टर वेळेच्या दहा मिनिटं आधी आले म्हणून बरं झालं. आता निदान मला भास होताहेत हा त्यांचा तर्क तरी त्यांना विसरावा लागेल. माझ्याकडली विल्स मी डॉक्टरांना दिली . झुरके ओढत आम्ही त्या भुताची वाट पाहात बसलो. दिलेली वेळ टळून वर आणखी दहा मिनिटं गेली. त्याचा पत्ता नव्हता. मेहता डॉक्टरांची दुसरी सिगरेट संपायला आली. क्लिनिकमध्ये भडाभडा बोलणारे डॉक्टर  तिथं फारसं बोलत नव्हते.  सकाळच्या वेळी फुकट फोर्टात यावं लागलं आणि येऊन फार काही साधलं नाही यामुळे ते वैतागले असावेत.  या चक्रम पेशंटमुळे हा नसता ताप असं त्यांना वाटत असणार. माझी अस्वस्था विचित्र होऊन गेली. डॉक्टर मेहतांशी काय बोलावं समजेना. आज त्यानं दगा दिलाय हे हळूहळू माझ्या लक्षात यायला लागलं. मी तिरक्या नजरेनं डॉक्टरांकडे पाहिलं. त्यांची मुद्रा शांत होती. माझाच चेहरा केविलवाणा होऊन गेला होता., “आज काय झालंय समजत नाही,” मी हताशपणा लपवीत म्हटलं.
खांद्यावर चापटी मारत डॉक्टर म्हणाले, “नेव्हर माइंड असं होतं अनेकदा. एकमेकांना बेटर लक नेक्स्ट टाईम म्हणूया.  दुसरं काय करणार. डोन्ट टेक टेन्शन अनल.”
डॉ. मेहतांच्या रूपानं आपल्याला समजून घेणारा एक समंजस माणूस आपल्याला मिळालाय--आपण त्यांना अधिकाधिक कोऑपरेशन दिलं पाहिजे- मी मनातल्या मनात निश्चय केला.

दुसऱ्या दिवशी ऑफिसला दांडी मारून डॉक्टरांच्या क्लीनीकमध्ये गेलो. कालच्या प्रकाराबद्दल माफी मागणं महत्त्वाचं होतं.
“डॉक्टर,  हे इल्यूजन नाही हे मला तुम्हाला पटवून द्यायचं होतं,” मी म्हणालो.
“हे बघा.” डोळ्यावरचा चष्मा काढून डॉक्टर म्हणाले. “आमच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला आपण जे बोलतंय ते खरं आहे, चुकीचं नाही हे पटवून द्यायचं असतं. त्याची  सगळी धडपड त्याचसाठी चालू असते. आणि आमची सारी धडपड अगदी त्याच्या उलट चालू असते. त्याला वाटतंय तो सारा भ्रम आहे हे त्याला एकदा पटवून दिलं की आमची ट्रिटमेंट संपली. अनल, आपल्या सेशन्सना तर नुकतीच सुरवात झाली आहे.”
डॉक्टर आपल्याला अजून पेशंट मानताहेत. मी पुन्हा अस्वस्थ झालो.
“पण मी तुमचं जे चाललंय हा भ्रम आहे असं म्हणत नाहीय. हे लक्षात घ्या. तुम्हाला ज्या गोळ्या दिल्यात त्या भ्रम दूर करण्यासाठी नाही तर शांत झोप लागावी म्हणून.”
“आय नो, डॉक्टर, पण पुढल्या गुरूवारी त्याच जागी तुम्ही पुन्हा येऊ शकाल ? मला कल्पना आहे, की मी फारच त्रास देतोय तुम्हाला. पण तो माणूस खरोखरी अस्तित्वात आहे हे मला दाखवून द्यायचंय तुम्हाला. प्लीज.”
“मला समजत नाही त्यासाठी तिथं कशाला जायला पाहिजे ?” डॉक्टर खुर्चीला रेलून म्हणाले, “आपण गृहीत धरून चालू, दॅट ही एक्झिस्ट. ओके ? आपल्या दृष्टीनं ते फारसं महत्त्वाचं नाही.”
“पण माझ्या दृष्टीनं आहे डॉक्टर. माझ्या दृष्टीनं खूप महत्त्वाचं आहे.”
“असं म्हणता ? ठीकाय येतो मी. पण त्या टॅबलेट घेत चला वेळेवर.”

गोळ्यांविषयी डॉक्टर एवढे पर्टीक्युलर का ? मी विचार करत राहिलो.

ठरल्यावेळी डॉक्टर आले खरे. आज तरी तो येतोय की नाही की मागच्या वेळेसारखेच होणार या चिंतेनं मी बेजार झालो. आधी डॉक्टर येतात की नाही याची चिंता लागून राहिली होती. आता ते हजर झालेत. तर तो मागच्याप्रमाणे टांग मारतो की काय याची चिंता वाटू लागली... आणि मला ज्याची काळजी वाटत होती तेच झालं. तो फिरकलाच नाही. आपल्या हालचालीच्या बातम्या त्याला कोण देतो की काय ? त्यानं दोन चार प्रायव्हेट डिटेक्टिव्ह ठेवलेत की काय आपल्या पाळतीवर ?
माझी अवस्था ओळखून डॉक्टरांनी सात्वंनासाठी माझ्या पाठीवर थोपटलं. "नेव्हर माइंड, चला, चहा पिऊया. इथं एलफिन्स्टनजवळ फर्स्टक्लास चहा मिळतो." डॉक्टरांनी मला दंडाला धरून मला चहाला नेलं.

डॉक्टर मेहतांची ट्रीटमेंट बंद करून टाकावी असा विचार केला. त्यांच्या असंबंध्द प्रश्नांना उत्तर देणं दिवसेंदिवस कठीण होत चाललं होतं. वाडेकरला विचारावं का ? त्याच्याच सल्ल्यावरून तर आपण मेहतांकडे गेलो. उद्यापासून पुन्हा फोर्टात चकरा मारून त्याच्या हालचालीवर कसून पाळत ठेवली पाहिजे. इलाजच नाही. जमल्यास त्याला टॅक्सीत घालून डॉ. मेहतांसमोर हजर करूया. जमेल का आपल्याला हे ?
दुसऱ्या दिवशी वाडेकरच्या कानावर सगळा प्रकार घातला. माझ्या निर्णयाबद्दलही संगितलं. वाडेकर वैतागला. तो वैतागणार हे एक्सपेक्टेड होतं. डॉक्टर मेहतांचं बिल किती झालं एकदा विचारून घे. मी त्याला म्हटलं. वाडेकरांच्या मते डॉक्टरांच्या भेटी बंद केल्या याचा अर्थ माझं वेड पराकोटीला गेलंय.
"तू सरळ त्या माणसाला जाऊन भेटत का नाहीस ? वाडेकर आवाज चढवून म्हणाला.
"तेच करणार आहे. त्याला डॉक्टरांच्या क्लिनीकमध्येच आणणार आहे."

वाडेकरपुढं वल्गना केल्या खऱ्या. पण त्याला खेचून क्लिनीकमध्ये आणणं मला शक्य होईल का. असा माणूस ज्याच्याशी शेकहॅंड करण्याची कल्पनाही आपल्याला सहन होत नाही.

त्या तोतयाच्या हालचालींची डायरीत नोंद करायला सुरवात केली खरी पण त्यामुळे टेन्शन कमी व्हायचं सोडून वाढत चाललं. इतकं की मला पुन्हा डॉ. मेहतांकडे जावं असं वाटू लागलं. त्यांना डायरीतला सगळा मजकूर सांगावासा वाटायला लागलं. बराच मजकूर अश्लील सदरात मोडणारा होता. रात्री सुमीला मी त्याच्या हालचालींचा रिपोर्ट देई. पण सगळा नाही. काही गोष्टी तिच्यापासूनही मला लपवाव्या लागत. काल तर तो मला एका हॉटेलमधून एका कोवळ्या मुलाबरोबर बाहेर पडताना दिसला. मुलानं आपला उजवा हात त्याच्या कमरेभोवती लपेटलेला दिसला. हे सर्व भर रस्त्यावर चालू होतं. बाहेर हा इतका बिनधास्त वावरतो तर आपल्या दृष्टीआड काय काय चाळे करत असेल...

या सगळ्याला आठवडा उलटला नसेल पेपरात पहिल्या पानावर पोलिस-स्मगलर चकमकीची बातमी वाचायला मिळाली. चकमकीत स्मगलर प्राणाला मुकला. मी अधाशासारखी बातमी झर्रकन वाचून काढली. पण निराशा पदरी पडली.
मनात आलं, हे काही ठीक नाही. त्याच्याबद्दल विचार करताना आपण इतक्या अमानुष थराला जायला नको असं मला वाटायला लागलं. त्याचा अपराध तरी काय तर तो हुबेहुब माझ्यासारखा दिसतो हा. मला स्वतःला मनातून गिल्टी वाटायला लागलं. डॉ. मेहतांकडे जावं असा विचार पुन्हा पुन्हा मनात येऊ लागला.
या नव्या लफडयामुळे रोजची कामं सुचेनाशी झाली होती. हालचालीत कमालीचा विकनेस जाणवत होता. सुमी मागं लागली होती-हॉस्पीटलात जाऊन थरो चेक-अप करून घ्या.
आपल्यासारखा एक माणूस आपल्या जवळपास वावरतोय हे चमत्कारिक खरं; पण त्याच्या प्रेझेन्सनं आपल्याला इतकं अस्वस्थ व्हायची काय गरज आहे ? हजारदा मी हा प्रश्न स्वतःला विचारला असेन.
त्याच्या भंपक हालचालींचा पाठपुरावा करणं मी थांबवलं. पण त्याच्या संबंधीच्या विचारानं माझा पाठपुरावा करायचं थांबवलं नव्हतं. मध्यंतरी स्वतःची शरम वाटावी असा एकदम भयंकर हिंसक विचार मनात आला. आपणही या थराला जाऊन विचार करू शकतो तर..
मी रस्त्यावर उभं राहून त्याच्यावर पाळत ठेवायचे उद्योग थांबवले. आऊट ऑफ साईट इज आऊट ऑफ माइंड म्हणतात त्याचा प्रयोग करून बघावा असं वाटायला लागलं.

दहा-पंधरा दिवसांनी मनातली अस्वस्थता थोडी कमी झाल्यासारखं वाटायला लागलं. थोडं फार नॉर्मल वाटायला लागलं.
तो- दिसायचा अधनंमधनं. आणि नाही दिसला तरी त्याचा विचार मनातून जात नव्हता. मध्येच एकदम श्वास कोंडल्यासारखा व्हायचा, पण मनाशी पक्कं ठरवलं, फार त्रास करून घ्यायचा नाही.
आपणच आपले सयकॅट्रिस्ट बनायचं. दिवस बरे चालले होते.

त्या दिवशीचा प्रकार मात्र सांगितल्यावाचून राहवत नाही.
नेहमीप्रमाणे रात्री जेवणानंतर मी डायरी लिहायला घेतली. दिवसभरात बरीच कामं उरकली होती. डायरीत त्याची नोंद करणं गरजेचं होतं. पण सुट्टीनिमित्त आलेल्या भाच्यांनी घरात धुमाकूळ घातला होता. एक शब्द कागदावर लिहिणं मुश्कील बनून गेलं. संदीपनं शेजारच्या मित्रांचा गोतावळा जमवला होता. राक्षसाचा मुखवटा घालून वेडेविद्रे आवाज काढून तो त्यांना घाबरवत होता.
संदीपला मी म्हटलं अरे, “तू कसा काय हा मास्क घातलास ? तू स्वतःच राक्षसाला किती घाबरतोस ?”
“म्हणूनच तर तो मी घातलाय.” संदीप त्या मुखवट्यामधूनच बोलला.
व्वा, हे एकदम ंछान. हुश्शार आहे पोरगं. राक्षसाची भीती वाटते; तो आपल्या नजरेसमोर नको म्हणून संदीप स्वतःच राक्षस बनला होता. ग्रेट आयडिया.

संदीपच्या या उत्तरानं मी मी हवेत उंच उडालो. जमिनीपासून सहा फूट उंचीवर मी तरंगू लागलो. हातातल्या डायरीची पानं फडफडली. त्यातून निर्माण झालेल्या वाऱ्याच्या झोतानं मी आणखी वर भिरकावला गेलो. अंतराळवीरासारखा हलका होऊन मंद अवकाशात तरंगत राहिलो. एक प्रकारची कालातीत अवस्था निर्माण झाली. आता डायरी बाळगायची काही गरज राहिली नाही. मी डायरी हातातून सोडून दिली. पण ती खाली न जाता माझ्याप्रमाणेच हवेत तरंगत राहिली. आपल्याला आता कायमचं स्लो-मोशनमध्ये जगायचंय हे मला कळून चुकलं. त्याच अवस्थेत मला कधी शांत झोप लागली कळलं नाही.
निद्रिस्त कालखंडात इतर मानवाप्रमाणे मीही माझ्या आशा, आकांक्षा, आकस आणि इतिहासासह नष्ट झालो.

* * * * *

आत्ता या क्षणी मी पलीकडच्या फूटपाथवर उभा आहे.
हातात फाइव्ह फाइव्ह फाइव्ह सिगारेट गळ्यात सोन्याची चेन, अंगात ऑर्केस्ट्रावाले घालतात तसं झक्कू जाकीट.
एकूण पेहराव हिंदी सिनेमातल्या स्मगलर व्हिलनला शोभावा असा.

आता मला तो कधीच दिसणार नाही आहे.
कारण मीच तो बनून गेलो आहे.
बाइकवर टांग टाकून मी अपोझीट फूटपाथकडे पाहिलं. अपोझीट फूटपाथवरून मला रोज ऑबझर्व्ह करणारं ते शामळू गबाळं पोरटं आज कुठं गचकलं कळत नाही, की साला, आपल्याच व्हीजनमध्ये काहीतरी फॉल्ट डेव्हलप झालाय ?

---

अवधूत परळकर
रोझ ब्लॉसम बी १२, सितलादेवी मंदिर मार्ग माहीम मुंबई ४०० ०१६